**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**जुने जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, पोस्ट ऑफिस शेजारी, नाशिक - 422001**
**दुरध्वनी क्र.** 0253-2977374 **Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/प्राधिकरण निधी बैठक-जाने-01/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
2 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
3 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
4 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
7 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
8 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
9 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
11 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
12 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
13 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
14 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
15 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
16 अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, आहिल्यानगर
17 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
18 मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
19 मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
20 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
21 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
22 मुख्यधिकारी, शिर्डी नगरपालिका
23 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दिनांक 30/01/2026 रोजी मा. अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा 2026-27 प्राधिकरणाची दि.30/01/2026 मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 18-02-2026 20:39:35

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दि.30/01/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि.30/01/2026 रोजी डॉ.श्री.प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.31/12/2025 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली त्यानुसार प्राधिकरणाने घेतलेली दि.31/12/2025 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.1 :- नाशिक परिसरातील विद्युत पुरवठा यंत्रणा बळकटीकरणाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी नाशिक यांनी सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण केले. तसेच नवीन ऊर्जा रोहित्र क्षमता वाढ करणे, अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे, उपकेंद्राचे नूतनीकरण, विद्युत वाहिनी उभारणे, सिंहस्थ शाहीमार्गातील कामे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण, आपत्तीव्यवस्थापन याबाबत सविस्तर माहिती नमूद केली. तसेच सदर कामे ही अत्यावश्यक असुन पावसाळयापुर्वी होणे गरजेचे असलेबाबत अधीक्षक अभियंता यांनी नमूद केले. मा.अध्यक्ष महोदयांनी शाही मार्गातील कामे करण्याबाबत महानगरपालिकेच्या संपर्कात राहून कामे तात्काळ करावीत तसेच अत्यावश्यक बाबींना प्राधान्य देण्याबाबत सूचना दिल्या. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु. 114.87 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.2 :- गोदावरी नदीवर गोदावरी-नंदिनी संगमाच्या खालील बाजूस रबर बंधारा (बलून बंधारा) बांधणे या कामास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी या प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर प्रकल्प पारंपारीत पध्दत वापरुन कमी खर्च करता आला असता काय याबाबत चर्चा झाली. याबाबत अधीक्षक अभियंता यांनी, हा बंधारा पारंपारिक सिमेंट बंधाऱ्यांपेक्षा वेगळा असून तो आधुनिक हायड्रॉलिक तंत्रज्ञानावर आधारित आहे. जेव्हा पाणी साठवण्याची गरज असेल, तेव्हा हा रबर फुगवला जाईल आणि पाण्याचा विसर्ग करायचा असल्यास तो बसवला (Deflate) जाईल. या बंधाऱ्याच्या आराखड्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला आहे आणि या बंधाऱ्यामुळे धरणातून सोडलेले पाणी थेट वाहून न जाता ते घाटांच्या परिसरात साठून राहील, ज्यामुळे लाखो भाविकांना पर्वणीच्या दिवशी सुलभतेने स्नान करता येईल. तसेच अधीक्षक अभियंता यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पीआयएल 173/2013 नुसार 3 एमसीएफटी पेक्षा जास्त क्षमतेचे बंधारे जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजूस बांधण्यास प्रतिबंध करण्यात आलेले असल्याने सदर तंत्रज्ञानच योग्य असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.36.72 कोटीचे कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.3 :- सिंहस्थ कुंभमेळा 2027 करीता नाशिक महानगरपालिकेअंतर्गत भूसंपादीत व अधीग्रहीत जागांचे सर्व्हेक्षण व अनुषंगिक कामे करणे करिता सर्व्हेअर सल्लागार नेमणेबाबत सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

सदर विषयाबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी साधुग्राम साठी करावयाच्या भूसंपादनामध्ये वाढ झाल्याने सदर सर्व्हेअरचे कामामध्ये देखील वाढ झाल्याचे नमूद केले. त्यानुसार सुधारित प्राकलन केले असता निविदादरानुसार एकूण

19.80 इतका खर्च अपेक्षित आहे. सदर निविदेतील अटी शर्तीनुसार परिणामात वाढ झाले असल्यास निविदा दराने देयक अदा करणे बाबत नमूद आहे. तसेच सदरचे निविदेतील अटीनुसार सर्व पात्र निविदा धारकांना निविदा दराने काम करणेबाबत नमूद केलेले आहे, त्यानुषंगाने सदरचे मंजूर निविदाधारक यांचेकडून निविदा दराने वाढीव काम करून घेता येईल असे मा.आयुक्त नाशिक महानगरपालिका, यांनी नमूद केले. त्यानुषंगाने रु.12.02 कोटीच्या कामाचे प्राकलन 1019.00 एकर करिता करणेत आलेले होते. आता सुधारित प्राकलन एकुण सुमारे 1906 एकर क्षेत्राकरिता एकुण रु.19.80 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सबब प्राधिकरणाच्या वतीने रु.19.80 कोटीच्या सुधारित रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.4 :— त्र्यंबकेश्वर नगरपरिषद हद्दीतील अतिरिक्त निधी कुंभमेळा प्राधिकरणाकडून निवाडा रक्कम वर्ग करण्याबाबत प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.. .**

मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद यांनी त्र्यंबकेश्वर नगरपरिषद हद्दीतील मोजणी प्रक्रिया सुरु आहे सदर मोजणी प्रक्रियेसाठी यापुर्वी रुपये 5.06 कोटी निधीची मागणी करण्यात आली होती व आता अतिरिक्त निधी रु.1.81 कोटीची मागणी अत्यावश्यक आहे असे नमूद केले. सबब रु.1.81 कोटीचे कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.5 :- चार पदरी नाशिक परिक्रमा मार्ग विकसित करण्यासाठी भूसंपादन करणेबाबत मोजणी फी च्या कामास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.. .**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ नाशिक यांनी चार पदरी नाशिक परिक्रमा मार्ग विकसित करण्यासाठी भूसंपादन मोजणी फीची आवश्यकता असल्याचे नमूद केले. त्यानुषंगाने सदरच्या कामास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता रु.1.75 कोटीचे कामांना सर्वानुमते देण्यात आली.

**विषय क्र.6 :- त्र्यंबकेश्वर येथे टप्पा — २ अंतर्गत दर्शन पथ २ व घाट, शाहीमार्ग शिवदर्शनपथ, विधी ची इमारत व दुकाने व गार्डन डेव्हलपमेंट करणे प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.. .**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ नाशिक यांनी दर्शन पथ 2 व घाट, शाहीमार्ग शिवदर्शन पथ, विधी ची इमारत, दुकाने व गार्डन डेव्हलपमेंट या कामांचे अनुषंगाने गर्दी नियंत्रणासाठी प्रवेश पथ बांधणे, बारमाही पुलाचे बांधकाम करणे, CCTV, AI यंत्रणेद्वारे गर्दी नियंत्रण, शिव उद्यान व व्यापारी गाळयांचे बांधकाम करणे,विधी भवन बांधणे, शाही मार्ग पथ सुधारणा अंतर्गत ज्योतिर्लिंग मंदिर ते कुशावर्त तीर्था कडे जाणाऱ्या ऐतिहासिक मार्गाची सुधारणा व त्यानुषंगीक सविस्तर माहिती नमूद केली. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.10.11.2025 रोजी पार पडलेल्या ज्योतिर्लिंग विकास आराखडयाच्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पाला तत्वत: मान्यता देण्यात आली होती तसेच दि.06.01.2026 रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत सदर प्रकल्प हा प्राधिकरणामार्फत मान्यतेसाठी सादर करणेबाबतच्या निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सदर प्रकल्पासाठी मा.अध्यक्ष महोदयांनी भूसंपादन व अनुषंगीक बाबींचा वाढीव खर्च होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत निर्देश दिलेत. सबब रु.390 कोटीचे कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.7:- नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणा-या कुंभमेळाचे अनुषंगाने शिर्डी येथील रस्ते व वाहनतळ करण्याचे कामास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद यांनी शिर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्ते व वाहनतळे यांचे अनुषंगाने सादरीकरण केले, त्यामध्ये रस्त्यांचे कॉक्रिटीकरण, पर्यायी रस्ता विकसीत करणे, रस्ता, डांबरीकरण पादचारी मार्ग विकसीत करणे, शिडी शहरामध्ये येण्यासाठी रस्त्याच्या फुटपाथचे पेव्हर ब्लॉक बसवुन रुंदीकरण करणे, एरीया/वाहनतळ जागेस चैनलिक कंपाऊंड व गेट करणे याबाबत सविस्तर सादरीकरण केले. मा.अध्यक्ष महोदयांनी

एरीया/वाहनतळ जागे कंपाऊंड व गेट करणे यासाठी जागा मालकीबाबत विचारणा केली असता मुख्याधिकारी शिर्डी यांनी सदर जागा शेतकी महामंडळाची असलेबाबत नमूद केले. तसेच मा.अध्यक्ष महोदयांनी प्रस्तावित कामे ही मंदिर संस्थानकडील आहेत काय याबाबत विचारणा केली यावर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी सदर कामे ही मंदिर संस्थानकडे नसल्याचे निदर्शनास आणून दिले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.24.53 कोटीचे कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.8 :- शिर्डीला जोडणारे संगमनेरचे निळवंडे-कौठे कमळेश्वर, वडगांवपान-निळवंडे व संगमनेर - वडगांवपान या रस्त्यांचे कामांना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरणे केले. पुणे -शिर्डी रस्त्यात मोठी वाहनांची रहदारी असुन वाहने ही निळवंडे- कौठे कमळेश्वर, वडगांवपान-निळवंडे व संगमनेर वडगावपान या मार्गाने जात असुन सदर रस्ताची अवस्था खराब असल्याने रस्त्यांचे कामे करणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.97.25 कोटीचे रस्त्यांच्या कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.9 :- सुंदरनारायण मंदिर व संरक्षित भिंत, नाशिक या राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन / संवर्धन कामास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांनी सदर मंदिर हे गोदावरी नदीपात्राजवळ असून महापुरामुळे मंदिरास धोका निर्माण होवु नये म्हणुन संरक्षण भिंत बाधणे, मंदिराच्या आतील व बाहेरील पृष्ठभागाची साफसफाई करून त्यावर संरक्षणात्मक थर देणे या कामांबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानुषंगाने मा.अध्यक्ष महोदयांनी सदर मंदिराजवळून नदीपात्राकडे पायऱ्या करता येतील किंवा कसे याबाबत विचारणा केली याबाबत सदर ठिकाणी पुरेसी आवश्यक जागा नसल्याने संरक्षण भिंत प्रस्तावित करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.1.86 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.10 :- कुशावर्त कुंड, त्र्यंबकेश्वर (भाग-2) या राज्य संरक्षित स्मारकांचे जतन दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांनी कुशावर्त कुंड या राज्य संरक्षित स्मारक परिसरात गंगा गोदावरी मंदिर, कणखल तीर्थ, मुख्य कुशावर्त कुंड, कांचन तीर्थ, केदारेश्वर मंदिर या स्मारकांचा समावेश होतो. केदारेश्वर, कांचनेश्वर व तिपमाळ या स्मारकांचे छत क्षतिग्रस्त झाले आहे. सदर बाबत दुरुस्ती, व आवश्यक अनुषंगीक कामे, तसेच मूळ बेसाल्ट दगडी फरशीवर स्टेनलेस स्टील रेलिंग, कोटा स्टोन व टेराझो स्टोन फरशी यांसारखी अतिरिक्त जोडकामे करण्यात येणार आहे येत आहेत. सदर कामे ही कुंड जतन व संवर्धन करण्यासाठी आवश्यक असल्याची बाब सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच फसाद लायटिंग ही सदर प्रस्तावात समाविष्ट आहे किंवा कसे याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी विचारणा केली त्यानुषंगाने फसाद लायटिंग हे काम इतर योजनेतुन घेण्यात येणार सहाय्यक संचालक यांनी नमूद केले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.3.12 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.11 :- कुशावर्त तिर्थकुंड व मंदिर परिसर, त्र्यंबकेश्वर (भाग-3) या राज्य संरक्षित स्मारकांचे जतन दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मंजुरी देणे..**

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांनी कुशावर्त तिर्थकुंड व मंदिर परिसर, त्र्यंबकेश्वर या राज्य संरक्षित स्मारकांचे जतन दुरुस्तीचे काम करण्याचे अनुषंगाने आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तसेच सदर काम हे कुंडालगतचा विकास करण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगीतले. सहायक संचालक यांनी

भाग दोन ची (विषय क्र. 10 ) कामे ही मंदिर संविर्धनाशी संबंधीत आहे. तसेच भाग तीन ची कामे ही मंदिरालगतचा परिसर विकासाशी संबंधीत असल्याचे नमूद केले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.1.83 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.12 :- गोदावरी नदीवरील डाव्या तिरावर टाकळी येथे गोदावरी-नंदिनी नदीच्या संगमाच्या वरील बाजूस घाट बांधणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी या प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर प्रकल्पामध्ये भूसंपादन व इतर आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला आहे काय याबाबत विचारणा केली तसेच याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी सदर प्रस्ताव तपासला आहे काय याबाबत विचाारणा केली यावर कुंभमेळा आयुक्त यांनी सदर प्रकल्पामध्ये भूसंपादन व इतर आवश्यक तुरतूदीचा सदर रकमेत समावेश करण्यात आला आहे तसेच सदर घाट हा गोदावरी व नंदिनी नदीच्या संगमाच्या वरील बाजूस (उत्तरेस) आहे. सदर घाट हा सुमारे 400 मी. लांबीचा आहे. सदर घाटामुळे कुंभमेळा शाही स्नानावेळी होणारी गर्दीचे नियोजन करणे साईचे होणार आहे असे कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.72.16 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.13 :- आयत्या वेळेचा विषय ..**

कुंभमेळा आयुक्त यांनी कुंभमेळयासंबंधी आराखडा बैठकीत सादर केला. त्यानुसार टप्पा 1 अंतर्गत 5140 कोटीचे कामांना शासनाने मान्यता दिलेली आहे. टप्पा 1 अंतर्गत रु.5121 कोटीचे कामांना प्राधिकरणाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच टप्पा 2 अंतर्गत रु.5276.78 कोटीचे कामांना प्राधिकरणाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व अनुषंगीक नियोजित रु.7026.41 कोटीची कामे प्रस्तावित आहेत, असे एकुण सुमारे रु.12303.19 कोटीची कामे टप्पा 2 अंतर्गत समाविष्ठ असुन मा.मंत्री समितीने रु.9600 कोटीचे कामांना मान्यता दिलेली आहे. तथापि सदर आराखडयामध्ये भविष्यात आवश्यक बाबींच्या अनुषंगाने बदलास वाव असल्याचे नमूद केले. सदर बैठकीत प्राधिकरणाने आराखडयास मान्यता देऊन पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी समितीमार्फत शिखर समितीकडे सादर करण्यास अनुमती दर्शविली.

उपरोक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी जी कामे शासनाचे पत्र दिनांक 29/08/2025 मध्ये नमुद नाही आणि / किंवा रू.5140.01 च्या मान्यतेच्या पलीकडे आहे त्या सर्व कामांबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम 2025 मधील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर प्रस्ताव हे शासनाकडे शिखर समितीकडे कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात यावे असे मा. अध्यक्ष, महोदयांनी निर्देशीत केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 14-02-2026 18:24:53

**( डॉ.प्रवीण गेडाम )**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक.**

# दि.३०.०१.२०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

१ जिल्हाधिकारी, नाशिक.

२ जिल्हाधिकारी, आहिल्यानगर

३ पोलीस आयुक्त, नाशिक शहर

४ पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.

५ आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.

६ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.

७ मुख्यधिकारी त्र्यंबक नगरपरिषद

८ उपायुक्त (नियोजन ) नाशिक

९ विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक

१० अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.

११ मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.

१२ अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, आहिल्यानगर

१३ मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.

१४ अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.

१५ सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक

१६ सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक

१७ कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.

१८ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.

१९ जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक. (यांचे प्रतिनिधी )

२० कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक

२२ सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.

२३ मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL.

२४ मुख्यधिकारी, शिर्डी नगरपालिका